S.P.I.T.
Inward No. 266
Date 26/12/17
Dept Exam

# मुंबई विद्यापीठ

गुण व प्रमाणपत्र कक्ष,
परीक्षा विभाग,
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८.

क्र.परीक्षा/गुण व प्रमाणपत्र कक्ष/१९८८/२०१७

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक व सर्व संबंधित विद्यार्थी यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, एप्रिल/मे, २०१७ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी प्रदान करण्यास पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे तपशील त्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर त्यांचे मराठी(देवनागरी) नाव अचूक यावे म्हणून/मराठी नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव व पडताळणी कामी विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर दि. २६ डिसेंबर, २०१७ पासून ते ३१ डिसेंबर, २०१७ (सायंकाळी ०५.००) पर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रमाणे संकेतस्थळाला भेट देऊन आपल्या मराठी नावाचा तपशील अचूक आहे याची खात्री करून घ्यावी तसेच नावात चूक आढळून आल्यास संकेतस्थळावर उपलब्ध तपशीलात दिलेल्या सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

उपरोक्त बाबींची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

www.mu.ac.in ⟶ Exam & Result ⟶ Examination ⟶ Convocation Correction(Marathi Name)

स्थळ : मुंबई,
दि. २२ डिसेंबर, २०१७.

प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक व सर्व संबंधित विद्यार्थी

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, मुख्य लेखापाल वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्वीय सहायक

प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ